**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय, लेखा व कोषागारे**
**कस्तुरी इमारत, तळ मजला, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर**
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**

**दुरध्वनी क्रमांक : ०२२-२२८८०१०६** E-Mail: aaoadmin-dat@mah.gov.in

क्र.संलेको-११-२०२५/प्रशा-राप-सलेअ/वले-१/दिव्यांग/UDID कार्ड/693 दि. 18 NOV 2025

**विषय: महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील दिव्यांग अधिकाऱ्यांनी दिव्यांगत्व प्रमाणपत्र (UDID कार्ड) सादर करण्याबाबत.**

**संदर्भ:** दिव्यांग कल्याण विभाग शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०२५/प्र.क्र.१०/E Office No.१३३९०२०/ कार्यासन-३, दि.०९.१०.२०२५

## परिपत्रक

महाराष्ट्र शासन दिव्यांग कल्याण विभागाच्या संदर्भीय शासन निर्णयान्वये शासन सेवेत कार्यरत असलेले तसेच भरती, पदोन्नती किंवा इतर शासकीय लाभ दिव्यांग आरक्षणांतर्गत घेत असलेले सर्व दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांनी वैध Unique Disability ID (UDID) कार्ड प्राप्त करून त्याची प्रत सादर करणे बंधनकारक आहे.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील सर्व दिव्यांग अधिकारी यांनी दिव्यांगत्व प्रमाणपत्र / UDID ओळखपत्राची प्रत या परिपत्रकाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत संचालनालयास सादर करावी. तसेच आपल्या दिव्यांगत्व प्रमाणपत्र / UDID कार्ड बाबतची सविस्तर माहिती Google form : https://forms.gle/Fh७५tjabkuV९P७६e८ वर भरणे आवश्यक आहे.

जे दिव्यांग अधिकारी दिव्यांगत्व प्रमाणपत्र /UDID ओळखपत्राची प्रत सादर करणार नाहीत किंवा चुकीचे/बनावट प्रमाणपत्र सादर केल्यास संबंधित अधिकारी यांच्या विरुद्ध दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ (कलम ९१) नुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

**(रश्मी नांदिवडेकर)**
**सहसंचालक (प्रशासन)**
**लेखा व कोषागारे,मुंबई.**

प्रति,

सर्व संबंधित सहाय्यक लेखा अधिकारी.



d:\ashwin_desktop\2025\da_letter_2025 (repaired) (repaired).doc